# डॉ. यशवंत मनोहर यांच्या सामाजिक कविता

**उत्कर्ष प्रविण गायकवाड**
संशोधक विद्यार्थी
श्री. माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम
ता. उमरगा जि. उस्मानाबाद

**प्रास्ताविक -**

डॉ. यशवंत मनोहर कवी म्हणून भारतात प्रसिध्द आहेत. त्यांचा पहिला काव्यसंग्रह उत्थान गुंफा (१९७७) साली प्रकाशित झाला. यानंतर मूर्तीभंजन (१९८५), जीवनायन (२००२) , काव्यभीमायन (१९८२), प्रतिक्षायान, अग्नीचा आदिबंध स्वप्नसंहिता (२००८), इ. काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांची कविता ही नवनिर्माणाची कविता आहे. विषमतेशी भांडणारी, नकार देणारी, शोषणाविरूध्द आवाज उठविणारी, माणूसकीची समाजात प्रस्थापना करणारी अशी ही कविता आहे. 'सब्बे सत्ता सुखी होन्तु' असे सर्वांच्या उन्नतीचे सुखाचे संविधान मूल्यच या कवितांमधून उत्कटपणे व्यक्त होते. जळत्या प्रश्नांच्या गर्दीत, अनेक विषमातपूर्ण वातावरण ही कविता संविधानावर आधारित नवसमाजरचनेचा युटोपिया उभारते.

**सामाजिक आशयाच्या कविता आणि संविधान मूल्ये -**

मनोहरांची कविता 'समष्टीची' आहे. ती माणसाचा गौरव करणारी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' उद्घोष करीत येणारी कविता आहे. ही कविता अनुभवाला थेट भिडते. पूर्वास्पृश्यांच्या अनुभवांच्या इतिहासापासून सर्वसामान्य माणसांच्या सुखा दु:खापर्यंत ती सहज येते. ही कविता व्यक्तीगत अनुभव किंवा दु:खापेक्षा दु:खाचे मूळ असलेल्या विषमतेच्या मूळावर, माणसाला गौणत्व देणाऱ्या कारणांवर बरसते. या सर्व गोष्टींविरूध्द, ती उठाव करते आणि माणसाला महत्त्व देते. माणसाचा इहवाद , विश्वास निर्भयता, मूल्याधिष्ठीतता इ. गुणांना महत्व देते आणि व्यवस्थेचे आमूलाग्र परिवर्तनाची अपेक्षा व्यक्त करते. डॉ. भा. ल. भोले म्हणतात, अशा समूळ परिवर्तनावाचून वर्तमान समाजातील कोणतीही व्याधी निवडून निघणार नाही, हे मनोहरांचे निदान त्यांना इतर कवींपेक्षा अधिक युगसापेक्ष ठरवते. या कवितेला दूरची मजल मारण्याचे बळ दिले आहे ते तिच्या ठिकाणी असलेल्या आत्मपरिक्षणाच्या तयारीने आणि संतापातही बेभान न होणाऱ्या सावधचित्ताने आमूलाग्र समाजपरिवर्तनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सर्व क्रांतिकारी साधन सामग्रीचे यथार्थ भान सामान्य माणसाच्या विवेकी व सुजाण कर्तव्यशक्तीला जागवून कृती प्रवण करण्याची तिची धडपड ही या कवितेची खास वेगळी वैशिष्टे होते. डॉ. भा. ल. भोळे यांनी मनोहराच्या कवितेची कृती प्रवणता, सुजाण कर्तव्यबुध्दीला संविधान मूल्याधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी असलेली आवाहन

क्षमता उचितपणे अधोरेखित केलेली आहे. या कवितेतला विद्रोह जाळणारा नाही तर नवनिर्मिती करणारा आहे. महत्वाची म्हणजे ही कविता युगसापेक्ष कविता आहे.

**सामाजिक न्याय :-**

ही कविता सामाजिक न्यायाची कविता आहे. मनोहरांच्या जीवनदृष्टी जीवन संघर्षापासून पलायन करणारी नाही. उलट 'भागो नही बदलो' हे त्यांचे तत्वज्ञान आहे. त्यांची कविता आक्रमक आणि त्वेषपूर्ण भाषेत दु:खावर बरसते. अन्यायच निपटून काढण्याची भाषा बोलते. माणसाला घायाळ करण्याचे आणि मूल्यांसाठी उभे करण्याचे सामर्थ्य तिच्यात निश्चित आहे. रूढीग्रस्त समाजाला ही कविता आव्हान देते. वैचारिकता हा तिचा गाभा आहे. एकूणच डॉ. युवराज सोनटक्के म्हणतात त्याप्रमाणे कवी मनोहरांच्या कवितेतला विद्रोह हा संरचनेत अनिवार्यत: मूल्याधिष्ठीत आहे. असंगत परिस्थितीत हा विद्राह मानवीय अस्मितेला अर्थपूर्ण करीत सामाजिक न्याय, समता आणि स्वातंत्र्याच्या पक्षाला सदृढ करतो. या विद्रोहाचे रूप विध्वंसक प्रवृत्ती नव्हे तर मूल्यप्रेरक प्रक्रिया आहे. आजपर्यंतचा सामाजिक न्याय हा वर्णवादी होता. त्यामूळेच अनेकांना शूद्रातिशूद्रांना, अस्पृश्यांना त्याचे चटके बसले आहेत. त्यामूळे इतिहासात कर्ण, एकलव्य, शंबुक बळी ठरलेत आणि आज ही हजारो माणसे / स्त्रीया जातीचा न्याय कवी नाकारतो आणि लोकशाहीतील 'न्याया'ची सामाजिक न्यायाची अपेक्षा करतो.

'दुनियेत चंद्रसुर्याच्या
मज कुणीच घेतले नाही
या जन्मीची कधी माझ्या
कुणी आई झाले नाही."

वरील कवितेतील 'पान्हा चोरणारी संस्कृतीची गाय' सर्वांची आई कशी होऊ शकली नाही ही खंत व्यकत होत आहे. मला कुणी आई नाही ही मातृहीनतेची जाणीव खुप वेदनादायी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी सुध्दा गांधीजींशी बोलताना 'I don't have my motherland' अशी हजारो वर्षे समाज तिष्ठत उभा आहे. हे कवी मन देशाला विचारत आहे. सामान्यांना सामाजिक न्यायाचा भाकर तुकडा नाकारला किती दिवस. आता हे चालणार नाही असा गर्भित इशारा ही कविता देते. राजकीय लोकशाहीच्या आधारे लोक आता सामाजिक लोकशाहीची वाटचाल करणार आहेत न्यायाच्या भूका वाढत आहेत. न्याय मागणाऱ्यांची संख्या वाढत आहे. कारण बाबासाहेब आंबेडकरांनीच त्यांना तुम्हीही माणसे आहात हे लक्षात आणून दिले. खैरलांजी इथे झालेल्या अन्यायासंदर्भात कवी लिहितो इतिहासात कोट्यावधी उष:काल मारणाऱ्या जातीयतेने पुन्हा खैरलांजीत चार क्षितीजे उद्ध्वस्त केली... खैरलांजी उगवणार नाही असे लोकशाहीचे क्षितिज शोधतो मी...माणुसकीच्या नावाच्या महामूल्यावर झालेला सामूहिक बलात्कार पाहिला इथे जाळली गेली परिवर्तनाची पालवी खैरलांजी, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र येथे घडलेल्या अमानुष दलित वंशहत्तेबद्दल कवी व्यथीत झाला आहे. एकाच कुटुंबातील आई, मुलगी, मुलगा यांच्या हत्येने संपूर्ण देश हादरला होता. जातीयतेचा अमानुष अत्याचार पाहून कवी म्हणतो मला न्याय हवा माणुसकीवर आधारीत समाज हवा आहे. माणसापेक्षा जात मोठी मानणारा वर्णवादी विचार

या हत्येतुन अधोरेखित झाला आणि परिवर्तन मूल्य पराभूत झाले. जोपर्यंत आपापसात बंधुता येणार नाही तापेर्यंत सामाजिक न्यायाची अपेक्षा खरे तर फोलच ठरणार आहे. हे एक मर्मभेदक सत्यही तो उजागर करतो की आतापर्यंत इतिहासात आणि वर्तमानात सुध्दा या संस्कृतीने जातीय बळी घेण्याचे प्रमाण वाढतच आहे म्हणून पुढे कवी म्हणतो

"असे कसे माहेर बाई हे माय नाही अन कुठे
बापही नाही
असे कसे कोडे म्हणावे ज्याला धरती नाही अन
आकाशही नाही
पायरीवरच खेळ मांडू आपल्या जातीचा याच
ध्येयवादाने तू ईश्वरप्रीय होशील
मोक्षाचा धन्य धनी होशील
सर्वांचा लाडका होशील तू..."
इथे जातीनुसार न्याय देणाऱ्या संस्कृतीचा
धिक्कार कवी करतो.

**समता, स्वातंत्र्य आणि बंधुता :**

समताधिष्ठित समाजरचनेसाठी जन्मसिध्द उच्चनिचतेच्या कल्पना बदलणे आवश्यक आहे म्हणून सामाजिक ज्वलंत प्रश्नांची उकल करण्यासाठी कवी पेटून उठतो सामाजिक वास्तवाचे स्वरूप या कवितेत पाहावयास मिळते कवीमन समूहजीवनाशी बाधील असल्यामुळे समूहाच्या वास्तवाची मांडणी करणे अपरिहार्य यांच्यातील सुखदु:ख, वेदना, जगण्याचा अनुभव या संबंधात अभिन्नता प्रस्थापित होते या कवितेतील समाजिक दु; ख आणि वेदनेचे वास्तव तीव्रपणे व्यक्त झाले आहे समतेचा, बंधुतेचा, स्वातंत्र्याचा जाहीरनामा म्हणजे मनोहरांची कविता आहे. कवी जातीय विषमतेविरोधात लिहितो "इथल्या दिशा कधी हळहळल्या नाहीत जखमांच्या पुरांनी मी पाहिली गावाबाहेरील झाडांची निरपराथ आयुष्ये केविलवाणी येतांना उत्तरे घेऊन आले जातांना प्रश्न घेऊन जाईन जातांना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन." या व्यवस्थेमधे माणसांमध्ये समता नाही. कारण बंधुत्वाचा अभाव आहे. माणूस जातींना दिसत नाही.या जाती नष्ट केल्या पाहीजेत. समाजात समता प्रस्थापित होणे गरजेचे आहे. या जातींना जाळणारी आग मी झालो आहे. जातींना जाळणारा हया कवीला समतेची प्रस्थापना करायची आहे कवी प्रा. पुरूषोत्तम पाटील यशवंत मनोहरांच्या कवितेबद्दल लिहितात, मी मनोहरांचा मराठी मायकोव्हस्की असा आवर्जुन उल्लेख करतो. १९९७ च्या ऑक्टोबर रशियन क्रांतीशी, लेनीनच्या नेतृत्वाशी अतुट बाधीलकी असलेल्या या प्रतिभावंत कवीने अत्यंत जळजळत्या शब्दांत शोषितांच्या आशा--आकांक्षांना उद्‌गार दिला होता क्रांती कवी म्हणून त्यांचेच नाव आग्रक्रमाने घेतले जाते. पाब्लो नेरूदवाने त्यांच्याबद्दल म्हटले होते "His power, tenderness, and wrath remain unparalled as models of poetic accomplishments" तसेच मनोहरांच्या काव्याबद्दल म्हणावे लागते तीव्र अदम्य आक्रमकता, दळल्या जाणाऱ्या अभाग्यांविषयीचा तसाच करूणा कोमलभाव आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरूध्दचा ज्वालामुखी उद्रेक पाहत ही तुलना उचित ठरावी. शोषितांची बाजू घेणारा अन्यायग्रस्तांच्या बाजूने उभा राहणारा हा कवी आहे.

या संदर्भात बाबुराव बागुल लिहितात, माणसाने निसर्गातील समान वाट्याची योजना

बळजबरीने आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. आणि हा जो कालचा पाऊस आमच्या गावात आला नाही म्हणजे ही एक प्रतिकात्मक तक्रार आहे. या मानवनिर्मिती व्यवस्थेन सुखाचा शिडकावा आमच्यावर होऊ दिला नाही तरी आम्ही निर्माते आहेत इथे एक समृध्द संस्कृती आम्ही निर्माण केली होती. बाबुराव बागुल यशवंत मनोहर यांच्या 'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही सदरहु आसवांवर पीक घेतले' या कवितेतील आशावादावर बोलत आहेत. जातीविषमतेला नकार देवून समतेचा पुरस्कार या कवितेतील विद्रोह करतो संविधानाने दिलेली सधीची समता अबाधित ठेवणे या कवितेला आद्य कर्तव्य वाटते.

‘मी संपूर्ण समतेचा उपासक आहे’
मी भारतीय आहे
मी बुध्दीवादी करूणेच्या काळजाने जगतो
मी भारतीय आहे’

भारतीय असणे म्हणजे भारतीय संविधान मूल्ये पाळणे होय. ही संविधानमूल्ये अंगीकरणे आणि त्यानुसार वर्तन करणे म्हणजे 'मी भारतीय आहे या ओळींना अर्थपूर्णता लाभणे होय. कवीचा दृष्टीकोन समतावादी आहे. संविधानाने मार्गदर्शक तत्त्वांमध्ये विश्लेषण केलेले इहवादी / विज्ञानवादी दृष्टीकोण कवी स्वीकारतो. संविधानातील बंधुतेचा आधारबध्द तत्वज्ञानातील 'करूणा' हाच आहे असा तर्कनिष्ठ विचार कवी मांडतो. कवी माणुसकीचे तत्व अवलंबितो हे अधोरेखित होते.

“मला मान्य नाही
तुम्ही माझ्या पहाटेची आई म्हणून
मला मान्य नाही मी
तुमचा कुणी नातलग म्हणून”

कवी अशा असंवेदनशील, स्वार्थी, धर्मांध, जात्यांध प्रवृत्तीच्या लोकांना तुम्ही माझे कुणीच नाही म्हणून नाकारतो आणि अशा व्यवस्थेला नाकारतो ही व्यवस्था, असा विषमतावादी देश आणि देशबाधव माझे कुणीच नातेवाईक नाहीत. जे माझ्या कष्टाची, जखमांची नोंदही घेत नाहीत. त्यांना बाधव कोणत्या न्यायाने म्हणावे हा कवीचा प्रश्न योग्य आहे. जग बदलत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा, संगणकयुगाचा प्रारंभ झाला परंतु मने मात्र बुरसटलेली आहेत. यासंदर्भात डॉ. मनोहर एकूण दलित कविते विषयी लिहितात, त्या त्या कवीच्या प्रकृती वैशिष्ट्यांमुळे अभिव्यक्तीत निराळेपणा जाणवत असला तरी मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना हे विचारसुत्र नजरेआड झाले नाही, अगदी ढसाळ, मनोहर यांच्यापासून भुजंग मेश्राम, प्रज्ञा पवार, अरूण काळे लोकनाथ यशवंत, महेंद्र भवरे, शशिकांत हिंगणेकर, अविनाश गायकवाड यांच्यापर्यंत हे सुत्र कायम असते मनोहरांच्या कवितेतील मूल्यांची प्रतिष्ठापना हे ध्येय डॉ. जाधव अधोरेखित करताना दलित कवितेचाच हा विशेष आहे. हे ही नोंदवितात संविधानमूल्ये मनामनात रूजली पाहिजेत. संविधानाने देशाला पुरेल एवढे माणुसकीचे स्वप्न आमच्या संविधानात आहे. माणसाला सुखमय जीवन जगण्याची रसद आमचे संविधान पुरविते. फक्त आम्ही 'संविधान' स्वत:त उतरविले पाहिजे. वर्तमानातून दाखविले पाहिजे. आंबेडकरवादी साहित्य संदर्भात एक महत्वाची गोष्ट म्हणजे ह्या साहित्याने स्वातंत्र्य, समता, बधुतेचे समर्थन नेहमीच केलेले आहे. मनोहरांच्या कवितेचे ते विशेष आहे.

**सामाजिक कविता - परिवर्तन नवसमाजरचना :** विद्रोहाची बोली या कवितेने स्विकारली आहे. ती

'आग' बनलेली आहे. परिवर्तनाच्या ध्यासाने हे मन झपाटले आहे. या कवितेची वैचारिकता, कल्पकता नवसमाजरचनेच्या नवव्यवस्थेच्या वेडाने रंगलेली आहे. आंबडेकरवादी कविता असल्यामुळे मूल्यमापनाची, आकलनाची मौलिक अशी नवदृष्टी या कवितेला प्राप्त झालेली आहे. वास्तवाचे समुचित भान संविधान मूल्य प्रस्थापनेचा नवा ध्येयवाद यामुळेही कविता युगसापेक्ष झाली आहे. ही कविता माणसाच्या उन्नयनासाठी प्रतिज्ञा करते. या कवितेचे सार सामर्थ्य खरे तर परिवर्तन मूल्यातच आहे. त्यामुळे ही कविता वैचारिक कवितांमध्ये आपले वेगळे वैशिष्ट्य राखून आहे. ही कविता नव्या समाजरचनेसाठी केवळ राजकीय लोकशाही पुरेशी नाही म्हणते.

"लोक तंत्र आमच्या संरक्षणाचे नि अभ्युदयाचे
संविधान
इथे आमच्या आदिवासीला, अस्पृश्याला
पंतप्रधान कशी होऊ देणार आहेस?
माय लोकशाहीचे वस्त्रहरण कधी रोखणार आहेस तू?
तू निर्मिलस गंभीर क्षितिज आणि आंबेडकर नावाच्या
क्रातीसूर्याचे संविधान
आणि वाटेला नव्या समाजवादाचे नवे डोळे दिलेस"

विसाव्या शतकाने माणसांची पुनर्रचना करणारे संविधान दिले. शेवटच्या माणसाला या संविधानाने अधिनायक बनविले. सर्वच स्त्रियांना नागरीक बनविले आणि समतेचा पाया दिला. परंतु आजपर्यंत एकही आदिवासी, अस्पृश्य पंतप्रधान झाला नाही. का ? तर लोकशाही मूल्य इथल्या सत्ताधाऱ्यांनी, उच्च जात वर्गाने आपल्या पायाखाली चिरडले. राजकीय लोक तंत्राचे सध्दा स्वरूप हुकुमशाही बनवले घराणेशाही बनविले कवि अशा उन्मत माणसांना, त्यांच्या प्रवृत्तीला नकार देतो आणि संविधानाच्या नितीतत्त्वांप्रमाणे लोकशाही बदलेल असा समाज निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. ही, लोकशाही हा देश कष्टकऱ्यांचा, दलितांचा, आदिवासींचा होण्याचा युटोपिया कवितेत जागवितो. बाबुराव बागुल मनोहरांच्या परिवर्तनवादी कवितेविषयी लिहितात, यशवंत मनोहर यांची कविता चारित्र्य संपन्न आहे. लिहिण्यात व जगण्यात ती एक आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखी ती सर्व आघाड्यांवर डौलाने वावरते. त्यांची कविता जडवादी क्रांतीचे रूद्ध सुंदर लेणे आहे. मनोहरांची कविता जगातील कुणालाही कळेल कारण परिवर्तनक्रांती या विश्‍व जाणिवा आहेत. मी पुन्हा पुन्हा म्हणने की ही कविता इतर पुरोगामी क्रांतीकारी कवींच्या कवितेपक्षा अधिक युग समांतर आहे. काळाला पुरून उरणारी आहे परिवर्तन हेच मूल्य या कवितेचे असल्यामुळे ही कविता युगसाक्षी आहे ती कोणालाही कळू शकते या कवितेतील आशावाद, नितीमूल्ये यांची जोपासना हे मनोहरांच्या कवितेचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे. प्रस्थापित व्यवस्थते त्यांना केवळ सधारणा नको आहे तर आमुलाग्र परिवर्तन हवे आहे. एकूणच सम्यक क्रांतीचे आशादायी स्वप्न पाहणारा हा कवी आहे मनोहरांच्या कवितेत आग लावण्याचे जसे सामर्थ्य आहे तसेच आग विझवण्याचे सामर्थ्य आहे. माणसं पटवण्याची करामत त्यात आहे आणि जळलेले वा जाळलेले पुन्हा साकार करण्याची किमयाही त्यात आहे. विध्वंसन आणि विधायकता, विनाश आणि निर्मिती हे दोन्हीही दिसून येतात.विषमतेला नाकारून नवीन समाजरचना करण्यासाठी ते तळमळत आहेत. मनोहरांच्या कवितेतली जाणिव परिवर्तनाशी बांधलेली आहे. कवी लिहितो,

"बंधु ! हे खरे की
माझ्या एका मुठीत ठिणग्या आहेत
पण त्यातला एकही निखारा
संविधानावर पडणार नाही मला
चंद्र बिनडागी करायचा आहे'

निर्माण आणि विध्वंस यात निर्माणाला संविधान मूल्यांना कवी महत्त्व देतो दंगलग्रस्त, जाळपोळीत संविधान डागळणार नाही. संविधानाला कुठेही दुय्यमत्व येणार नाही. याची काळजी कवी घेतो. आपल्याभोवती निर्माण झालेला जाळ आपणच विझवला पाहिजे. परंपरावाद्यांनी, जातीय वैमनस्य पसरविण्याचा अखंड कार्यक्रम हाती घेतलेला आहे. माणसे जात, धर्म वंश, लिंग या सर्वांना नाकारून नागरिक आहेत. संविधान त्यांना वरील भेदामुळे वेगवेगळे समजत नाही. "एक माणूस एक मूल्य' हा संदेश संविधान देते तोच संदेश कवी कवितेतून देत आहे. जात, वर्ग, वर्ण, लिंग असे भेद न मानणाऱ्या माणसांचा समतेवर न्यायावर, बंधुतेवर स्वातंत्र्यावर आधारित समाज कवीचे ध्येय आहे जे कवितेतून साकार होत आहे समताधिष्ठित नव समाजरचना हा या कवितेचा ध्येयवाद आहे. डॉ. जनार्दन वाघमारे लिहितात, 'यशवंत मनोहरांच्या कवितेतील विद्रोहाचे रौद्र रूप प्रतिबिंबीत झाळे आहे बर्फालाही पेटवणारा तो विद्रोह आहे. खरे तर त्यांची कविता ही वादळ वाहीनी आहे. वाचकांच्या भावनांना हातात निखारे घेऊन ती स्पर्श करते. आणि त्याचबरोबर त्यांच्या डोक्यात विचारांचा कल्लोळ माजविते. विद्रोहाचा असा वर्षाव मराठी मुलखात कधी झाला नसावा. यशवंत मनोहरांची कविता घाव घाळून जग बदलण्याचे आवाहन वाचकांना करते. सामाजिक पुनर्घटनेच्या तत्वज्ञानाचा ती पुरस्कार करते वाघमारे यांनी मनोहरांची कविता अशी आग आहे की जी बर्फालाही पेटवू शकते. तर विघातक रूढी परंपरांना ती जाळायला निघाली आहे कारण त्या कवितेसमोर नवसमाजरचनेचे स्वप्न आहे. जग बदलण्याचा ध्येयवाद आहे ही कविता क्रांतीगर्भ आहे. उद्याच्या उषःकाल तिच्या गर्भात आहे आणि म्हणून तिला सूर्याचे डोहाळे लागले आहेत. असे त्यांना वाटते. असाच विचार या कवितेच्या संदर्भात डॉ. मनोहर जाधव करतात. नामांतर आंदोळन ते खैरलांजीमधील हत्याकांड अशा अस्वस्थ आणि दाहक सामाजिक घटनांना या कवितेने केवळ स्पर्श केला नाही. तर त्याबाबत जागरूकतेची आणि ठोस निषेध नकाराची कणखर भूमिका घेतली आहे. या अर्थाने ही कविता सातत्याने परिवर्तन सन्मुख राहीली आहे आणि या कवितेचे ते बलस्थान आहे डॉ. मनोहर या कवितेची विषयाची व्याप्ती प्रथम नोंदवितात आणि तिच्या विद्रोहाची व्यापकता विशद करतात. ही आशावादी कविता आहे. मनोहरांची कविता परिवर्तनवादी आहे कवी म्हणतो,

"हे असेच उरणार नाही
नवे जगणे जागा घेईल
दाही दिशा गर्भार आहेत
नवी जमीन रूजू होईल

विषमता, आणि अन्याय करणारे किती ही जोमाने वाढले तरीही सर्व काही बदलण्याच्या पलीकडे गेले आहे असे कवीला वाटत नाही. जे आहते ते असेच राहणार नाही. बदलासाठी भूमी तयार आहे दलित शोषित समाजाची वृत्ती आशावादी आहे. ते या नव्या समाजाचे अधिनायक होऊ शकतात. कारण आजपर्यंत अनेकदा त्यांनी मृत्यूशी झुंज दिलेली आहे कत्तलखोरांच्या सर्व राहुट्या जाळण्याची त्यांची क्षमता आहे Young Man नव समाजरचनेचा युग नायक आहे कवी लिहितो,

"हृदयाने माझ्या मागीतळ एक नजर
जिच्यात तिरस्कार नसेल
आणि एक अपर्यायी विश्वास ज्यातून
माणूस गहाळ नसेल
मागितले प्रवाहासारखे वाहणे आणि
कंठासाठी भयमुक्त गाणे

कवीची अपेक्षा अशी आहे की बंधूतेवर आधारीत समाज ज्यातून माणूस गहाळ नसेळ अशा समाजाची निर्मिती बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेची निर्मिती फार काळजीपूर्वक केलेली आहे आंबेडकरी चळवळ ही खरे तर सम्यक प्रबोधनाची चळवळ आहे. माणसामाणसांतील अंतर वाढत आहे. ते एकमेकांपासून दूर जात आहेत आंबेडकरवादी साहित्याला केवळ साहित्यक्षेत्रातील परिवर्तन नको आहे तर समग्र परिवर्तन अपेक्षित आहे. समग्रव्यवस्थेतील बदल हवा आहे. माणसाला ज्या समाजात, कोणीही खालच्या जातीचा म्हणून पशुवत वागविणार नाही किंवा गरीब श्रीमंत असा भेद राहणार नाही हा समाज निर्माण करणे हेच स्वप्न आहे. सामाजिक सांस्कृतिक संघर्षातील ही कविता एक शस्त्र आहे. ही कविता वैचारिक आहे. स्वातंत्र्य समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि धर्म, जात, वंश, लिंग, निरपेक्षता ही आपल्या काळातील महामूल्य आहेत. त्यांचा आविष्कार ही कविता करते. हा कवी दलित दलितेत्तर यांच्यातील अंतर कमी करण्याची अपेक्षा करतो. कवीचा लेखन प्रपंचच मुळी उपाशीपोटी माणसांना स्वप्न देणारा, गरीब, लाचार माणसांभोवती संरक्षणाची ढाल बनून उभा राहण्यासाठी आहे कवी दु:खी, अपमानी माणसांच्या हक्कांसाठी कवितेला लढाई करण्यास सांगतो आणि माणुसकीच्या विजयासाठी कविता लिहतो. नवी मूल्यव्यवस्था निर्माण करणे हाच या कवितेतील वैचारिकतेचा गाभा आहे.

**संदर्भसूची :**

1. प्रा. डॉ. भास्कर भोळे, समाज प्रबोधन पत्रिका, मे जून १९७८.
2. डॉ. युवराज सोनटक्के, 'यशवंत मनोहरांच्या कवितेतील विद्रोह', डॉ. यशवंत मनोहर एक प्रज्ञाशील प्रतिभा, संपा. डॉ.अरूणा देशमुख, युगसाक्षी प्रकाशन नागपूर, प्र. आ. ५ सप्टेंबर २००४.
3. डॉ. यशवंत मनोहर, उत्थान गुंफा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे तू. आ. २००१.
4. यशवंत मनोहर, 'अग्नीचा आदिबंध', युगसाक्षी प्रकाशन, प्र. आ. १४ एप्रिल २००८.
5. डॉ. मनोहर जाधव, 'दलित कविता : बदलते स्वरूप-परिवर्तनाचे प्रवाह', पद्मगंधा प्रकाशन पुणे प्र. आ. २०१९.